****************************************************************************************


# जिल्हा परिषद गोंदिया
## (आरोग्य विभाग)

१ ला मजला, मुख्य प्रशासकीय इमारत, आमगांव रोड, फुलचुर, गोंदिया

**dhozpgondia123@gmail.com**
**dho.go-mh@gov.in**

07182-299091


संदर्भ :- जिल्हा निवड समिती बैठक दिनांक 16-12-2025 चे कार्यवृत्त.

## कंत्राटी वैद्यकीय अधिकारी (गट-ब) यांची समुपदेशनाद्वारे पदभरती सूचना

**(प्रसिध्दीचा दिनांक 18-12-2025)**

जिल्हयातील प्राथमिक आरोग्य् केंद्र व त्याअंतर्गत आयुर्वेदिक / आंग्ल दवाखाने/ फिरते पथक येथे रिक्त असलेली वैद्यकीय अधिकारी (गट-ब) यांची खालीलप्रमाणे रिक्त असलेली 21 पदे बीएएमएस अर्हताधारक उमेदवारांमधून कंत्राटी स्वरूपात भरण्याकरीता **दिनांक 29-12-2025 रोजी प्रशासकीय इमारत, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद गोंदिया** येथे समुपदेशन (Councelling) आयोजीत करण्यात आले आहे. यासदंर्भात **www.gondia.gov.in** तसेच **zpgondia.gov.in** या संकेतस्थळावर अटी व शर्ती उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

**भरावयाची रिक्त पदे :-**

1) **प्राआके कावराबांध**, 2) **प्राआके शेंडा**, 3) **प्राआके गोठणगाव**, 4) **प्राआके खोडशिवनी**, 5) **प्राआके फुटाणा**, 6) **आयु.दवा.अर्जुनी (प्राआके इंदोरा/बु)**, 7) **आयु.दवा.चिचटोला (प्राआके बनगाव)**, 8) **आयु.दवा.कटटीपार (प्राआके कालीमाती)**, 9) **आयु.दवा.ननसरी (प्राआके कालीमाती)**, 10) **प्राआके महागाव**, 11) **आयु.दवा.तेढा (प्राआके तिल्ली/मोह)**, 12) **प्राआके चिखली**, 13) **प्राआके कोरंभीटोला**, 14) **फिरते पथक पुराडा, प्राआके मुल्ला**, 15) **फिरते पथक पालांदूर/जमी**, 16) **आयु.दवा.सोनपूरी (प्राआके कावराबांध)**, 17) **आयु.दवा.मुरमाडी (प्राआके वडेगाव)**, 18) **आयु.दवा.गांधीटोला (प्राआके सातगाव)**, 19) **प्राआके इळदा**, 20) **प्राआके सातगाव**, 21) **आयु.दवा.बाराभाटी (प्राआके महागाव)**

**अटी व शर्ती :-**

1) सदर पदे ही शासन निर्णय दिनांक 27-12-2022 चे अधिन राहुन समुपदेशनाद्वारे भरण्यात येत आहेत.
2) उमेदवारांच्या नावाची नोंदणी ही सकाळी 10.00 ते दुपारी 12.00 पर्यंत या ठरलेल्या वेळेतच करण्यात येईल. त्यानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. दुपारी 12.00 ते 1.00 वाजेपर्यंत डेटा एन्ट्री व गुणवत्ता यादी तयार करणे, उमेदवारांचे आक्षेप नोंदविणे. दुपारी 1.00 वाजेपासून समुपदेशन प्रक्रिया सुरू करण्यात येईल.
3) समुपदेशनाचे वेळी रजिस्टरमध्ये उमेदवारांच्या नावाची नोंदणी करण्यात येईल आणि त्यांना माहिती भरणेकरीता विवरणपत्र देण्यात येईल. सदर विवरणपत्रात संपूर्ण नाव, व्यक्तीगत ई-मेल, पत्ता, मोबाईल क्रमांक, शैक्षणिक, व्यवसायिक अर्हता, अनुभव याबाबत संपूर्ण माहिती भरावी आणि त्यासोबत दस्तऐवजांच्या सत्यप्रती सादर कराव्यात. **महाराष्ट्र आयुर्वेद परिषद मध्ये BAMS अर्हता नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील.**
4) रिक्त पदे भरल्यानंतर पुढील तीन महिन्यात रिक्त होणाऱ्या पदांचा आढावा घेऊन उर्वरीत सर्व उमेदवारांचा समावेश प्रतिक्षा यादीमध्ये करण्यात येईल.
5) **ज्यांचा कार्यकाळ पुढील तीन महिन्यांत संपणार आहे अशा कंत्राटी वैद्यकीय अधिकाऱ्यांना सदर पदाकरीता अर्ज करण्यास पात्र करण्यात येत आहे.** अशा उमेदवारांनी अर्ज सादर करतांना अनुभव प्रमाणपत्रासोबत सचोटी व काम समाधानकारक असल्याचे संबधित वैद्यकीय अधिकारी यांचेकडील प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा त्यांचे अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

6) शासकीय आरोग्य संस्थेतील 11 महिन्याच्या अनुभवाकरीता प्रति वर्ष ग्राहय धरून 02 गुण देण्यात येतील आणि किमान 6 महिने ज्यांनी आरोग्य संस्थेत अनुभव घेतला आहे अशा अनुभवाकरीता 01 गुण देण्यात येतील. अनुभवाकरीता गुणांची कमाल मर्यादा ही 10 गुण एवढी राहील.

7) AIPGET द्वारे पदव्युत्तर पदवी अर्हता धारण केलेल्या उमेदवारांना 10 गुण अतिरिक्त देण्यात येतील. तसेच AIPGET द्वारे पदव्युत्तर पदविका अर्हता धारण केलेल्या उमेदवारांना 05 गुण अतिरिक्त देण्यात येतील. पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या गुणांची कमाल मर्यादा ही 10 गुणांचे वर असणार नाही.

8) उमेदवांरानी सादर केलेल्या दस्तऐवजांची पडताळणी करून गुणांचे निकष ठरविण्यात येतील आणि त्यानुसार डेटा एन्ट्री करून गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.

9) गुणवत्ता यादीमध्ये नोंदणी केलेल्या सर्व उमेंदवारांचा समावेश झाला आहे याबाबत खात्री करून ही यादी सर्व उमेदवारांना दाखविण्यात येईल आणि माहिती अचूक असल्याबाबत त्यांनी खात्री केल्यानंतर उमेदवारांच्या रकान्यासमोर उमेदवारांची स्वाक्षरी घेण्यात येईल. गुणवत्ता यादीवर उमेदवारांचे आक्षेप असल्यास आक्षेपांची सत्य पडताळणी करून आक्षेपाचे तात्काळ निराकरण करण्यात येईल.

10) आक्षेप पूर्तता अंती गुणाणुक्रमांनुसार उतरत्या क्रमाने अंतिम गुणवत्ता यादी (मेरिट) तयार करण्यात येईल आणि मेरीट यादीनुसार पात्र असलेल्या उमेदवांराचे समुदेशन घेऊन त्यांना त्यावेळी रिक्त असलेल्या पदानुसार त्यांचे नावाची निवड करण्यात येईनल. अशा पात्र उमेदवारांची अंतिम निवड यादी ही www.gondia.gov.in तसेच zpgondia.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

11) सदस्य सचिव तथा जिल्हा आरोग्य् अधिकारी यांनी त्यांचे स्वाक्षरीने नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येतील व नियुक्तीच्या ठिकाणी उमेदवारांनी सात दिवसांचे आंत रूजू होणे बंधनकारक राहील. सात दिवसांचे आंत नियुक्तीच्या ठिकाणी जे उमेदवार रूजू होणार नाहीत अशा उमेदवाराची निवड रदद करण्यात येईल व प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना संधी देण्यात येईल.

12) पदभरतीच्या कोणत्याही वेळी वरील अटीमध्ये फेरबदल वा रदद करण्याचे अधिकार जिल्हा निवड समिती यांनी राखून ठेवले आहेत.

**(डॉ.अभिजीत गोल्हार)**
सदस्य सचिव तथा जिल्हा आरोग्य् अधिकारी
जिल्हा परिषद गोंदिया